महाराष्ट्र शासन

# उपजिल्हा रुग्णालय कणकवली.


| | |
|---|---|
| फोन नंबर(कार्या.) :- (०२३६७)२३३९५९<br>अपघात कक्ष :- २३२०५८<br>प्रसुति कक्ष :- २३२४३१ | नरडवे रोड,कोर्टाजवळ, मु.पो.ता. कणकवली<br>जिल्हा सिंधुदुर्ग. पिन ४१६६०२<br>Email id :- ms_sdhkankavali@yahoo.co.in |


आरोग्य सेवा

जा.क्र.उजिरुक/आस्था/एनएचएम/शिबिर व्यवस्थापनदरपत्रक / २५४८ /२५

दिनांक :- २०/०९/२०२५

## दरपत्रक जाहिरात

विषय:- राष्ट्रीय आरोग्य अभियान२०२५-२६ करिता प्राप्त अनुदानातून स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना अंतर्गत शिबिर व्यवस्थापनाकरिता दरपत्रके मागविणे

संदर्भ:- मा.जिल्हा शल्य चिकित्सक,जि.रु.सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्रएनएचएम/१७३६/१९-०९-२०२५
२. दिनांक २०/०९/२०२५ रोजीची कार्यालयीन मंजूर टिपणी

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय कणकवली,ता-कणकवली जि-सिंधुदुर्ग या आरोग्य संस्थमध्ये स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान कालावधीमध्ये वैदयकिय व दंतरोग शिबिर घ्यावयाचे असल्याने त्यासाठी प्राप्त अनुदानातून उपजिल्हा रुग्णालयातील या आरोग्य शिबिरातील रुग्णांची भोजन व्यवस्था करणेसाठी तसेच शिबिरास येणाऱ्या विशेषज्ञांना राहण्याची व्यवस्था करणेकरिता पुरवठादार दरपत्रके मागवून निश्चित करणे प्रस्तावित आहे. त्यासाठी खालिल अटी शर्तीना अधिन राहून इच्छुक पुरवठारदारांकडून मोहोदबंद पाकिटातून दरपत्रके मागविणेत येत आहेत. विहित अटी व शर्तीची पूर्तता करणा-या पुरवठादार यांनी खाली सहि करणार यांच्या नावे दरपत्रके दिनांक २६/०९/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने अथवा प्रत्यक्ष वैदयकिय अधिक्षक,कार्यालय,उपजिल्हा रुग्णालय कणकवली,ता-कणकवली,जि. सिंधुदुर्ग यांचे कार्यालयामध्ये आणून दयावायाची आहेत.सदर दरपत्रके त्याच दिवशी दि. २६/०९/२०२५ रोजी सायं.५.०० वाजता वैदयकिय अधिक्षक,उपजिरु कणकवली यांचे दालनामध्ये त्यांचे अध्यक्षतेखाली उघडण्यात येतील.

| अ.क्र | आवश्यक बाबींचा तपशिल | दर |
|---|---|---|
| ०१ | लाभार्थी डॉक्टर,स्टाफ व ईतर लोकांकरिता नाष्टा- पोहे,उपिठ,शिरा,वडापाव,सामोसे | दर प्रति एक नग |
| ०२ | लाभार्थी डॉक्टर,स्टाफ व ईतर लोकांकरिता लोकांकरिता साधाचहा,स्पेशलचहा,कॉफी | दर प्रति एक नग |
| ०३ | शाकाहरी जेवण - (चपाती,डाळ,भात, एकपालेभाजी,एकउसळ, पापड, लोणचे ,कांदा, दही) | दर प्रति एक व्यक्ती |
| ०४ | स्पेशल शाकाहरी जेवण(चपाती/भाकरी,डाळ,भात, एकपालेभाजी,एकउसळ,पापड,लोणचे,चटणी,दही,कोशंबिर,श्रीखंड/गुलाबजाम) | दर प्रति एक व्यक्ती |
| ०५ | मांसाहारी जेवण-( चपाती/भाकरी,भात,चिकन,चिकन ग्रेव्ही,लिंबू, कोशंबिर) | दर प्रति एक व्यक्ती |
| ०६ | राहण्यासाठी हॉटेलमध्ये एसी रुम (वायफाय,गरम पाणी,जेवण,नाष्टा सहित) | दर प्रति एक रुम प्रतिदिन भाडे |

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती

1) पुरवठादार संस्थेचे /मालकाचे नोंदणी प्रमाणपत्र,किंवा जीएसटी नंबर झेरॉक्सप्रत दरपत्रकासोबत असावी.
2) पुरवठादार संस्थेचे /मालकाचे पॅनकार्ड, झेरॉक्स दरपत्रकासोबत असावी.
3) वरील तक्त्यात नमुद साहित्य व आवश्यक संख्या ज्या दरपत्रकधारकाचे दर मंजूर होतील त्यांना कळविणेत येतील-

4) मंजूर दरपत्रकानुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर काम पूर्ण झाल्यावर त्यासोबत झालेल्या रकमेच्या देयक तात्काळ कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे.शासकिय प्रचलित दरानुसार आवश्यकतेप्रमाणे टीडीएस रक्कम वजा करुन देयकाची रक्कम आपणास अदा केली जाईल.
5) मंजूर दरपत्रकानुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य एक दिवसाच्या आत वैदयकिय अधिक्षक,उपजिरु कणकवली येथे पोहोच करावयाचे आहे त्यासाठी स्वतंत्र रक्कम अदा केली जाणार नाही. साहित्य विहित कालावधीमध्ये पोच न झाल्यास ०.५ टक्के दंड प्रति आठवडा याप्रमाणे आकारण्यात येईल आणि तो देयकातून वसूल करणेत येईल.
6) विहित मुदतीत प्राप्त न होणारी दरपत्रके ,नाकारणे तसेच आवश्यक ते सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकार वैदयकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय कणकवली,ता-कणकवली,जि-सिंधुदुर्ग यांचेजवळ राहतील . याबाबत कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही .अगर न्यायालयात जाता येणार नाही.
7) दर पत्रके बंद लिफाफ्यामध्ये असावित व त्यावर राष्ट्रीय आरोग्य अभियान आरकेएस दरपत्रके असे स्पष्ट लिहावे.
8) साहित्याचे दरामध्ये, वहातुक खर्च,भराई,तोलाई,हमाली,उतराई, सर्व प्रकारचे कर इ सर्व बाबींचा समावेश असावा-
9) साहित्याचे दर सर्व करांसहित सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या दोन वर्षाकरिताचे असावेत

वैदयकिय अधिक्षक गट-अ
उपजिल्हा रुग्णालय कणकवली
ता-कणकवली,जि-सिंधुदुर्ग

प्रत –

उपजिल्हा रुग्णालय कणकवली यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
www.nrhm.maharashtra.gov.in
www.arogya.maharashtra.gov.in
it.nhm-mh@nic.in